# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.12.2025** **वारः गुरुवार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी ओमानमध्ये दाखल; भारत आणि ओमानमध्ये मुक्त व्यापार करारावर आज होणार स्वाक्षरी

अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक लोकसभेत मंजूर

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत उमेदवारी अर्जाबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सर्वाधिकार देण्याचा राज्य मंत्रीमंडळाचा निर्णय

आणि

मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडच्या सर्व खात्यांची धुरा आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे

**मोदी-दौरा-NOA**

जॉर्डन आणि इथियोपियाचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी काल ओमानमध्ये पोहोचले. मस्कत विमानतळावर ओमानचे उपपंतप्रधान सैयद शिहाब बिन तारिक अल सईद यांनी मोदी यांचं स्वागत केलं. दोन्ही देशात विविध क्षेत्रातील परस्पर सहकार्य दृढ करण्यासंदर्भात दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. भारत आणि ओमान यांच्यात आज ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या होणार आहेत. यासाठी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल हे देखील मस्कतमध्ये पोहोचले आहेत.

**Intro** :

अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक काल लोकसभेत मंजूर झालं. या क्षेत्रातील सुरक्षितता अधिक भक्कम करणं, दर्जा सुधारणं आणि आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठीच्या यंत्रणा बळकट करण्याची तरतूद या विधेयकात आहे. या कायद्यामुळे २०४७ पर्यंत शंभर गिगावॉट अणु ऊर्जा निर्मितीचं लक्ष्य साध्य होईल असा विश्वास अणुऊर्जा राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना व्यक्त केला. ते म्हणाले...

*बढ़ती हुई एनर्जी की जरूरतों को पूरा करने के लिए तथा आत्मनिर्भर भारत के लक्ष्य को पूरी तरह प्राप्त करने के लिए ये भी जरूरी है कि हम पेट्रोलियम फॉसिल पदार्थों पर अपनी निर्भरता कम करे उस सबको मिला कर के जहाँ आज हमारी न्यूक्लियर एनर्जी की कैपेसिटी मात्र आठ दशमलव आठ गिगावॉट है उसको सौ गीगावॉट तक पहुँचाना ताकि दो हज़ार सैंतालीस में हमारी एनर्जी की रिक्वायरमेंट का दस प्रतिशत हिस्सा न्यूक्लियर एनर्जी से आए।*

या कायद्यामुळे अणुऊर्जेसारख्या क्षेत्राची दारं खासगी कंपन्यांसाठी उघडली जातील असा आरोप करून काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक इत्यादी पक्षांनी या विधेयकाला विरोध केला. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर विरोधकांनी सभात्याग केला.

विकसित भारत ग्रामीण रोजगार हमी आणि उपजिविका अभियान विधेयकावर काल  लोकसभेत चर्चा झाली. केंद्रीय कृषि मंत्री शिवराजसिंह चौहान आज या विधेयकवरील चर्चेला उत्तर देणार आहेत.

दोन हजार किलोमीटर रेल्वेमार्गावरची कवच प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल लोकसभेत दिली.

पथकर वसुलीच्या पद्धतीऐवजी स्वयंचलित नंबर प्लेट ओळख प्रणाली पुढल्या वर्षीपासून लागू केली जाईल, असं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी काल राज्यसभेत सांगितलं. महामार्गावर वाहनांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि वाहतुकीचा वेळ कमी करण्यासाठी नवी प्रणाली लागू करण्यात येणार असल्याचं ते म्हणाले.

निरस्तिकरण आणि दुरुस्ती विधेयक २०२५ काल राज्यसभेत चर्चेनंतर मंजूर झालं. लोकसभेनं हे विधेयक कालच मंजूर केलं होतं. एकंदर ७१ कायदे रद्द करण्याची आणि ४ कायद्यांमध्ये सुधारणा करायची तरतूद या विधेयकात आहे.

**<u>राज्यमंत्रीमंडळ निर्णय</u>**

निवडणूक अधिनियम १९६१मध्ये सुधारणा करण्याचा अध्यादेश काढण्याला राज्य मंत्रिमंडळानं काल मान्यता दिली. त्यानुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारी अर्जाबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम ठरवण्यात येईल.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमातल्या तरतुदीनुसार उमेदवारी अर्ज स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारायला नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करता येते. मात्र विविध जिल्हा न्यायालयांमध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी अशा अनेक याचिका प्रलंबित राहत असल्यानं निवडणुका कालबद्धरित्या घेणं शक्य होत नाही, त्यामुळे या तरतुदी वगळण्याबाबतचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगानं शासनाला पाठवला आहे. त्यानुसार हा निर्णय घेतल्याचं राज्य शासनाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे.

राज्यातल्या गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारकांच्या परिसरातील अतिक्रमणं रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णयही कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

**<u>निवडणूकआयुक्त</u>**

नगरपरिषदा आणि नगरपंचायतीसाठी येत्या शनिवारी मतदान होणार आहे आणि रविवारी मतमोजणी होणार आहे. मतदानाच्या तसंच मोजणीच्या दिवशी अनुचित घटनांना आळा घालण्यासाठी वेळीच उपाय योजना कराव्यात आणि अशा घटना घडल्या तर त्वरित कठोर कारवाई करावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत. नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या तयारीसंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि निवडणूक निर्णय अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

**<u>माणिकरावकोकाटे</u>**

राज्य सरकारमधील मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडून मंत्रिपदाचा पदभार काढून घेण्यात आला आहे. त्यांच्याकडे क्रीडा आणि युवक कल्याण, तसंच अल्पसंख्यांक मंत्रालयाची धुरा होती. माणिकराव कोकाटे यांच्याकडची सर्व खाती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. याबाबतची विनंती मान्य केल्याचं राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे कळवलं आहे.

दरम्यान सदनिका घोटाळा प्रकरणी माणिकराव कोकाटे यांच्याविरुद्ध नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयानं काल अटक वॉरंट जारी केलं. कोकाटे रुग्णालयात दाखल असल्यानं अटक पुढे ढकलण्याची विनंती करणारा अर्ज त्यांच्या वकिलांनी केला होता. मात्र न्यायालयानं हा अर्ज फेटाळून लावला, तसंच या प्रकरणाच्या अंतिम सुनावणीला गैरहजर राहिल्याबद्दल कोकाटे यांच्यावर ताशेरे ओढले.

नाशिक जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाला कोकाटे यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं. या प्रकरणाची तातडीनं सुनावणी घ्यावी, अशी मागणी त्यांच्या वकिलांनी केली, मात्र न्यायालयानं या प्रकरणाची सुनावणी उद्या म्हणजे शुक्रवारी ठेवली आहे.

**<u>Intro :</u>**

**<u>ओशनमॅन</u>**

रत्नागिरीतले बांधकाम व्यावसायिक राहुल भोसले यांनी दुबईत नुकतीच झालेली ओशनमॅन वर्ल्ड चँपियनशिप यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

*लहानपणापासून एखाद्या गोष्टीची आवड जोपासून, त्या विषयात मेहनत घेतली असेल, तर यशाचा किनारा नक्की गाठता येतो. याचं उदाहरण रत्नागिरीतले बांधकाम व्यावसायिक राहुल भोसले यांच्या रूपाने पाहायला मिळालं आहे. दुबईत झालेली ओशनमॅन वर्ल्ड चँपियनशिप स्पर्धा त्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. निर्धारित साडेचार तासांच्या कालावधीत समुद्रात १० किलोमीटर अंतर पोहून पार करण्याचं उद्दिष्ट पूर्ण करणं आवश्यक होतं. सतत उसळणाऱ्या लाटा आणि समुद्रातले अनिश्चित प्रवाह अशा आव्हानांना तोंड देत भोसले यांनी ते उद्दिष्ट गाठलं. ३० ते ३९ वर्षं वयोगटातून ते सहभागी झाले होते. मध्यंतरी काही काळ आपण फिटनेसच्या प्रवासापासून दूर गेलो होतो; मात्र कुटुंबीय, मार्गदर्शक आणि प्रशिक्षकांच्या पाठबळामुळे ही कामगिरी शक्य झाल्याचं ते म्हणाले. लहानपणी गावातल्या विहिरीपासून सुरू झालेला प्रवास या स्पर्धेमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचल्याची भावना*

*त्यांनी व्यक्त केली. ही स्पर्धा पूर्ण करणारे ते रत्नागिरीतले पहिलेच जलतरणपटू आहेत. स्पर्धा म्हणजे स्वतःच्या क्षमतेची ओळख करून देणारं साधन असल्याचं ते म्हणतात. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी*

**निवडणूक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, भयमुक्त आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पाडण्यासाठी महानगरपालिका प्रशासन सज्ज झालं आहे, असं आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. पिंपरीचिंचवडमध्ये एकंदर ३२ प्रभाग असून प्रत्येक प्रभागात ४ सदस्य याप्रमाणे १२८ सदस्य संख्या निश्चित करण्यात आली आहे, त्यापैकी ५० टक्के म्हणजेच ६४ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. महापालिका क्षेत्रात एकंदर १७ लाख १३ हजार ८९१ मतदार आहेत.

**चंद्रपूरमनपा**

चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी २ लाख ९९ हजार ९४ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यासाठी ३५५ मतदान केंद्र निश्चित करण्यात आली आहेत, निवडणूक प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज आहे अशी माहिती निवडणूक अधिकारी अकुनुरी नरेश यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. मनपा हद्दीतील प्रचार आणि जाहिरात फलक हटवण्याचं काम सुरू आहे, त्याचबरोबर निवडणुकीत पैशांचा गैरव्यवहार होऊ नये, यासाठी चार पथकं तैनात केली जातील असं नरेश यांनी सांगितलं.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातला लखनौ इथं नियोजित असलेला वीस षटकांचा चौथा क्रिकेट सामना काल दाट धुक्यामुळे रद्द करण्यात आला.

मैदानाची अनेक वेळा पाहणी केल्यानंतर, पंचांनी अखेर सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत २-१नं आघाडीवर आहे. मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना उद्या अहमदाबादमध्ये नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे.

**हवामान**

राज्यातला थंडीचा जोर अजूनही कायम आहे. आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**